# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## अंतर्गत परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधित शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी (शासनमान्य पदावरील तसेच विद्यापीठ निधी व इतर निधीतून कार्यरत) यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र.न्यायप्र-२३०२/प्र.क्र.८/विशि-१, दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२३ मधील परिच्छेद क्र.२ (३) नुसार संबंधित कर्मचाऱ्यांचे माहे, फेब्रुवारी, २०२३ या महिन्यापासूनचे वेतन सुधारित केलेल्या वेतनश्रेणीनुसार करावे असे कळविण्यात आले असल्याने सदर पत्रातील सूचना विचारात घेऊन माहे, फेब्रुवारी, २०२३ या महिन्याचे वेतन देयक सादर करावे असे मा.सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे यांनी पत्र क्र.सेवार्थ-२०२३/(११३५/२३)/लेखा-२/५०३, दिनांक १४ फेब्रुवारी, २०२३ अन्वये विद्यापीठ कार्यालयास कळविले आहे. त्यानुसार सुधारित वेतननिश्चितीचे तक्ते तयार करण्याचे कामकाज सुरु करण्यात आलेले असून ते मा.सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे यांचेकडून तपासून घेण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर प्रक्रियेस काही अवधी लागणार आहे.

या पार्श्वभूमिवर कर्मचाऱ्यांची आर्थिक गैरसोय होऊ नये यादृष्टीने माहे जानेवारी, २०२३ मध्ये अदा करण्यात आलेल्या वेतनाइतकी रक्कम माहे फेब्रुवारी, २०२३ च्या वेतनापोटी अग्रीम म्हणून देण्यात येणार आहे. तसेच अदा केलेली सदर रक्कम माहे फेब्रुवारी, २०२३ व मार्च, २०२३ या महिन्याच्या वेतनात दिनांक ३१ मार्च, २०२३ पूर्वी समायोजित करुन घेण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
जावक क्र.वित्त/२०२२-२३/1475
दिनांक : २८/०२/२०२३

**(सीएमए चारुशीला गायके)**
**वित्त व लेखा अधिकारी**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
२. सर्व संचालक, प्रशाला
३. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग

} सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.